Satpuda Education Society, Jalgaon Jamod

# Art & Commerce College, Warwat Bakal

## Tq. Sangrampur Dt. Buldhana

**Organized by**

**Department of Political Science**

**One Day Interdisciplinary National Conference on**

# 75 YEARS OF INDIAN DEMOCRACY

## *Certificate*

This is to certify that **शाहिद मुस्ताक मुल्ला, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.** has participated / presented research paper entitled ''भारत - अमेरिका समकालिन संबंध'' in the **National Online Interdisciplinary Conference on "75 YEARS OF INDIAN DEMOCRACY"** organised by the Department of Political Science, Art & Commerce College, Warwat Bakal on 28 February 2022.

His/her paper has been published in **Peer Reviewed Refereed & UGC Listed Journal No. 47100 "GENIUS" ISSN 2279-0489 with Impact factor 6.631.**

**Dr. Rajendra Korde**
Dept. of Political Science,
Art & Comm. College, Warwat Bakal,
Dist. Buldhana.

**Dr. Jagannath Chaudhari**
Principal,
Art & Comm. College, Warwat Bakal,
Dist. Buldhana.

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

ISSN - 2279 - 0489

VOLUME - X, ISSUE - II - February - July - 2022

Impact Factor - 6.631 (www.sjifactor.com)

ISO 9001:2015 QMS
ISBN / ISSN

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Is Hereby Awarding This Certificate To

शाहिद मुस्ताक मुल्ला

In Recognition of the Publication of the Paper Titled

भारत - अमेरिका समकालिन संबंध

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X Issue - II February - July - 2022

English / Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | वाढती बालमजुरी एक अभिशाप<br>**डॉ. राजेश सुधाकर डोंगरे** | १-५ |
| २ | स्त्रि-सुरक्षा आणि भारतीय लोकशाही<br>**श्री. शिंगणे नागेश श्रीकृष्ण** | ६-८ |
| ३ | भारताच्या विकासात महिलांचे योगदान<br>**डॉ. राष्ट्रपाल गणवीर** | ९-१४ |
| ४ | सयुक्त राष्ट्र संघात भारताची भूमिका<br>**प्रा. शेख गफूर अहमद** | १५-१८ |
| ५ | भारतातील ७५ वर्षात महिलांच्या राजकीय प्रवासाची वाटचाल<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | १९-२३ |
| ६ | भारतीय लोकशाही आणि जाती व्यवस्था<br>**डॉ. राजेंद्र कोरडे** | २४-२७ |
| ७ | लिंगभाव समस्या आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. डॉ. वैशाली शा. कंकाळे** | २८-३६ |
| ८ | दक्षिण आशियातील देशांशी चीनचे वाढते संबंध आणि भारतावरील प्रभाव<br>**पाटील गायत्री विश्वास**<br>**डॉ. के. बी. पाटील** | ३७-४३ |
| ९ | ग्रामीण व शहरी भागातील ग्रंथालयांमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास<br>**शशिकांत सुभाष पाटील** | ४४-४८ |
| १० | भारताचे परराष्ट्र धोरण व पंडित जवाहरलाल नेहरुंची भूमिका<br>**प्राचार्य डॉ. सुभाष गवई**<br>**महादेव उकर्डा सातव** | ४९-५२ |
| ११ | भारत - अमेरिका समकालिन संबंध<br>**शाहिद मुस्ताक मुल्ला** | ५३-५८ |

# ११. भारत - अमेरिका समकालिन संबंध

**शाहिद मुस्ताक मुल्ला**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना**

**आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास हा अभ्यासाचा नवीन व स्वतंत्र असा विषय आहे प्राचीन काळातील राज्य स्वावलंबी होती त्यामुळे त्यांचा परस्परांशी जास्त संबंध येत नव्हता परंतु राष्ट्र- राज्याच्या उदयामुळे आणि दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या पाठीवर निर्माण झालेल्या राष्ट्रांत मुळे जगातील सर्व देशांचा परस्परांशी संबंध येणे परिहार्य झाले त्यामुळे अंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन भिन्नभिन्न संकल्पना आहे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये दोन देशातील फक्त राजकीय संबंधांचा अभ्यास केला जातो तर आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये दोन देशातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक ,राजकीय अशा सर्व संबंधांचा अभ्यास केला जातो. जगातील वाढती लोकसंख्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा त्या पूर्ण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या सहकार्याची व मदतीची आवश्यकता असते किंवा भासते त्यामुळे आजचे जग हे परस्परावलंबीतत्वाचे असल्याचे दिसते. दोन राष्ट्रांमध्ये संबंध येणे ही बाब परिहार्य ठरली आहे. हे संबंध काही वेळा मित्रत्वाचे असतात तर काही वेळा शत्रुत्वाचे असतात. अशा पद्धतीने आज जगाच्या पाठीवरील सर्व देशांचा एकमेकांशी कोणत्या ना कोणत्या बाबतीत संबंध हा येतच असतो . प्रत्येक राष्ट्र राष्ट्रहिताचा विचार करून अंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपली भूमिका बजावत असतो. तसेच प्रत्येक राष्ट्र परराष्ट्र धोरण ठरवत असताना देखील राष्ट्रहिताचा विचार करत असते. भारताचा संबंध देखील अनेक राष्ट्रांशी येत असतो त्यामध्ये प्रामुख्याने अमेरिकन संबंधांचा विचार करणे खूप महत्त्वाचा आहे 1990 पूर्वी भारताचे अमेरिकेशी असणारे संबंध फारसे चांगले नव्हते त्यानंतर अनेक घटना घडामोडींमुळे भारत आणि अमेरिका संबंध सुधारत केल्याचे दिसते प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारत अमेरिकन समकालीन संबंधांचा करण्याचा प्रयत्न केला आहे. भारत अमेरिका संबंध सुरुवातीपासून आज पर्यंत म्हणावे तेवढे चांगले किंवा वाईट असे राहिलेले नाहीत वास्तविक पाहता उभय राष्ट्राची कोठेही सीमा एकमेकांना भिडलेली नाही. तरीदेखील दोन्ही देशातील संबंधांचा अभ्यास करणे अत्यंतिक आवश्यक आहे**

**उद्दिष्टे**

- **अमेरिका-भारत समकालीन संबंधांची चर्चा करणे.**
- **अमेरिका आणि भारत यांच्यातील परराष्ट्र संबंध ची माहिती घेणे.**
- **नरेंद्र मोदी यांचे भारत अमेरिका संबंधतील योगदान अभ्यासणे**
- **आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिका व भारत देशाची भूमिका अभ्यासणे**

**संशोधन पद्धती**

**प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वियम संशोधन साधनांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, पुस्तके, इंटरनेट ,माहितीपर लेख यांचा संदर्भ घेण्यात आला आहे.**

**व्याप्ती**

**प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्तीही भारत- अमेरिका समकालीन संबंधाची सर्व परिप्रेक्ष्यातून चर्चा करणे आणि दोन्ही राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणात झालेल्या बदलांची नोंद घेणे तसेच पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी व नरेंद्र मोदी यांच्या कालखंडातील भारत- अमेरिका संबंधाची चर्चा करणे व सद्यकालीन अमेरिका -भारत संबंधाचे विवेचन करणे ही आहे.**

**विषय विवेचन**

**भारत व अमेरिका ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारी राष्ट्रे आहेत. अमेरिका ही जगातील सर्वात जुनी लोकशाही असणारे राष्ट्र म्हणून ओळखले जाते तर भारत हे जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या राष्ट्र म्हणून ओळखले जाते. त्यामुळे अशा दोन राष्ट्रांचे संबंध कसे होते? कसे आहे? त्याचे विवेचन करणे महत्त्वाचे आहे. "वसुधैव कुटुम्बकम" या व्यापक दृष्टिकोनातील परिणामांमध्ये मुख्यतः राष्ट्रीय हिताचे धोरण राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सुरक्षिततेच्या तत्त्वानुसार दृढतेने परराष्ट्र धोरण राबवण्यात येते. भारताच्या स्वातंत्र्य पासून आजपर्यंत अमेरिका व भारत यांच्यातील संबंधांचा अभ्यास करता आपणास असे म्हणता येईल की जास्त काळापर्यंत उभय राष्ट्रातील संबंध वितुष्टांचेच राहिलेले दिसतात असे असले तरी त्यातील काही काळ का होईना उभय राष्ट्रात सहकार्याचे संबंध प्रस्थापित झालेले दिसून येते. नव्या सहस्त्रकात जगात घडलेल्या अनेक घडामोडी मुळे उदाहरणार्थ: दहशतवाद, सोविएत युनियनचे विघटन, इत्यादी उभय राष्ट्र एकमेकांच्या जवळ येण्यास मदत झालेली आपणास दिसून येते. अमेरिका व भारत हे दोन्ही राष्ट्रे ब्रिटिशांच्या गुलामगिरीत होते अमेरिका भारता पूर्वी स्वातंत्र्य झाला तेव्हा भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात ब्रिटिशांविरुद्ध अमेरिकेने भारताला भरघोस मदत केलेली दिसून येते.**

**1962 मध्ये भारत-चीन युद्धाच्या वेळी देखील अमेरिकेने भारताला आर्थिक व लष्करी मदत भरीव स्वरूपात केली. नरसिंहराव पंतप्रधान झाले तेव्हापासून अमेरिके बरोबरील संबंध सुधारू लागल्याचे दिसून येते कारण त्यांच्या काळात अमेरिकन सैनिक सहकार्याचा प्रस्ताव भारताने स्वीकारलेला दिसतो. अटल बिहारी वाजपेयी यांनी सुरुवातीपासून परराष्ट्र व्यवहारांमध्ये विशेष सारस्य दर्शविले. त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासात परराष्ट्र धोरणाचे महत्व ओळखले वायूवेगाने होत असलेल्या वैज्ञानिक प्रगती व तांत्रिक सुधारणांमुळे संपूर्ण जग एका 'ग्लोबल विलेज 'मध्ये रुपांतरीत झाले . दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी दोन गटात झाली एक साम्यवादी गट रशिया व दुसरा लोकशाही विचारसरणीचा गट अमेरिका त्यावेळी भारताने अलिप्ततेची भूमिका स्वीकारली. सुरुवातीच्या काळात दोन्ही राष्ट्रांमध्ये विरोधी भूमिका होती त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे-**

**भारताचे वैयक्तिक हित आणि अमेरिकेची विरोधी भूमिका**

**ज्या प्रश्नात भारताचे वैयक्तिक हितसंबंध गुंतलेले असतील अशा प्रश्नाबाबत अमेरिकेची नेहमीच विरोधी भूमिका राहिली होती. त्यातील काही बाबी पुढील प्रमाणे**

1. **कश्मीरचा प्रश्न- ज्या ज्या वेळी कश्मीरचा प्रश्न उपस्थित होत गेला त्याच्या वेळी अमेरिकेने पाकची बाजू घेत भारत विरोधी भूमिका घेतल्याने उभय राष्ट्रातील संबंध बिघडल्याचे दिसते.**
2. **गोवा प्रश्न- भारताला स्वातंत्र्य मिळवून बराच काळ लोटला तरी गोवा पोर्तुगीजांच्या आधिपत्याखाली होता. भारताने लष्करी कारवाई करून गोवा प्रदेश आपल्या देशात समाविष्ट केला. वास्तविक पाहता पोर्तुगीज नाटो या लष्करी संघटनेचा सदस्य असल्यामुळे अमेरिका आपणास या प्रश्नात सर्वतोपरीने मदत करीन असे पोर्तुगीजाना वाटत होते. गोवा हा भारताचा देश आहे हे माहित असून देखील तो मुद्दा युनोच्याआमसभेत मांडला. त्यामुळे अमेरिकेला अपयश आले. थोडक्यात गोवा हा भारताचा आहे हे माहीत असूनही त्याला अमेरिकेने निष्कारण आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिले म्हणून उभय राष्ट्रातील संबंध बिघडले**
3. **अमेरिकेचा पाक ला शस्त्रपुरवठा- पाक भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे पुढे धोका निर्माण करताना दिसत आहे तरीदेखील डिसेंबर 2004 मध्ये अमेरिकेने पाकला एफ -16 विमाने व शक्तिशाली क्षेपणास्त्रे देण्याचे मान्य केले त्यामुळे भारताची सुरक्षितता धोक्यात येणार अशा प्रकारची चिंता भारताने दर्शवली तरीदेखील अमेरिकेने त्याच्याकडे दुर्लक्ष केले व उभय राष्ट्रातील संबंध अधिकच बिघडले. दीगो - गार्सिया- या प्रश्नात देखील अमेरिकेने भारत विरोधी भूमिका घेतल्याचे दिसते.**

**अमेरिकेचे वैयक्तिक हित व भारताची विरोधी भूमिका**

**खालील काही बाबतीत अमेरिकेचे वैयक्तिक हितसंबंध होते त्याला भारताने विरोध केला - ते पुढील प्रमाणे**

1. **कोरियाचा प्रश्न - 1950 मध्ये अमेरिकेने त्याची बाजू घेतली त्यावेळेस भारताने अमेरिकन धोरणावर टीका केली त्यामुळे दोन राष्ट्रातील संबंध बिघडले.**
2. **क्युबा प्रश्न- क्युबाला अमेरिकेने मदत केली व साम्यवादी राजवट उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला त्यावेळेस भारताने अमेरिकेच्या या धोरणाला विरोध केला.**
3. **अफगाणिस्तान प्रश्न- यावेळी अमेरिका दक्षिण आशियाई राष्ट्रांची सुरक्षित धोक्यात आणत आहे अशा प्रकारची टीका अमेरिकेवर भारताने केली.**
4. **इराक प्रश्न- इराक दहशतवादी राष्ट्र आहे. तिने अमेरिकेवर वारंवार हल्ले केले यावेळी भारताने मदत करावी अशी अमेरिकेने भारताला मागणी केली. इराक भारताचा मित्र असल्यामुळे भारताने अमेरिकेच्या या मागणीकडे दुर्लक्ष केले. अशाप्रकारे दोन्ही राष्ट्रांचे एकमेकां बरोबर संबंध बिघडण्यास वरील सर्व परिस्थिती कारणीभूत होती परंतुअलीकडच्या काळात भारत-अमेरिका संबंधात कमालीची सुधारणा झाल्याचे दिसते.**

**पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळात भारत-अमेरिका संबंधात सुधारणा होण्यास सुरुवात झाली 1998 यावर्षी वाजपेयी पंतप्रधान झाले त्यावेळी संबंध फार मधूर नव्हते सी .टी. बी .टी करारावर भारताने सह्या करण्यास नकार दिला त्यामुळे पाश्चात्य राष्ट्रांची नाराजी झाली. अशा स्थितीत जसवंत सिंग अमेरिकन उपपरराष्ट्रमंत्री स्ट्रोब टालबट यांना भेटत राहिले .आणि चर्चेच्या दहा फेऱ्यांच्या शेवटी अमेरिकेचा विरोध एकदा मावळला हे हृदय परिवर्तन केवळ अण्वस्त्र धोरणा पुरताच मर्यादित नव्हतं. तर अतिरेक्यांविरुद्ध सहकार्य यातून निर्माण झाले. वाजपेयी यांनी बिल क्लिंटन, जॉर्ज बुश या राष्ट्राध्यक्षांच्या काळात भारत अमेरिका संबंध सुधारण्यासाठी खूपच प्रयत्न केले. तसेच नरेंद्र मोदी यांच्या काळात अमेरिका संबंधाला वेगळेच वळण लागले आर्थिक शैक्षणिक व्यापार लष्कर अशा सर्वच क्षेत्रात दोन्ही राष्ट्रांचे संबंध खूप सलोख्याचे व मैत्रीचे बनत चालले आहे. भाजपप्रणीत दोन्ही पंतप्रधानांच्या काळात भारत-अमेरिका संबंधात मोठी सुधारणा झाल्याचे दिसते नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून म्हणजे 2014 पासून आजपर्यंत मोदींनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची प्रतिमा सुधारण्यासाठी व राष्ट्रहित जपण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या देशांची सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी विविध देशांना भेटी दिल्या त्यापैकी मोदींनी फक्त अमेरिकेला सात वेळा विविध बाबींसाठी दौरे केले या दौऱ्याचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसते .नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून त्यांचा संबंध अमेरिकेतील तीन राष्ट्राध्यक्षांची आला आहे. त्यात बराक ओबामा ,डोनाल्ड ट्रम्प ,जो बायडेन यांचा समावेश होतो ट्रम्प आणि मोदी यांचे मैत्री तत्वाचे संबंध असून त्यांच्या काळात भारत-अमेरिका संबंधात विलक्षण प्रगती झाल्याचे दिसते.**

**ट्रम्प यांनी एका भाषणात असे म्हटले आहे की "भारत-अमेरिका यांच्यातील संबंध असामान्य स्तरावर पोहोचले आहे आपण भारतासारख्या अतुलनीय देशाचा प्रथमच दौरा केला या दौऱ्यात द्विपक्षीय संबंधांमध्ये भरपूर प्रगती झाल्याचे दिसून येते". अध्यक्ष ट्रम्प यांच्या काळात भारत अमेरिका यांच्यातील संबंध अधिक मजबूत झाले आहेत. दोन्ही देशांची लोकशाही आणि दहशतवाद विरोधा बाबत असलेली कटिबद्धता हा अमेरिकेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा भाग असल्यामुळे भारत हा अमेरिकेचा नैसर्गिक मित्र आहे असे म्हटले जाते.**

**भारत आणि अमेरिका ही जगातील सर्वोत्तम लष्कर असणारी राष्ट्रे असल्यामुळे मोदी, ट्रम्प यांनी या गोष्टीवर अधिक भर दिला .गेल्या दहा-बारा वर्षात संरक्षण क्षेत्रात भारत -अमेरिका संबंध चांगलेच सुधारले आहे भारताने अमेरिकेकडून सामरिक महत्त्वाची विमाने( सी-17 ग्लोब मास्टर व सी- 130 हक्यूर्लिस) आधुनिक रडार विकत घेतली आहे.इस्राईलने अमेरिकेच्या अनुमतीने भारताला तीन फाल्कन अवॅक्स( एअर बोर्न वार्निंग अंड कंट्रोल) विमाने विकली त्याच बरोबर भारतीय नौदलासाठी युद्धनौका जलाश्व घेतली .यामुळे भारताची सामरिक झेप संपूर्ण हिंद महासागरात पोहोचली आहे. याशिवाय आणखी म्हणजे धाकटे बुश यांच्या काळात भारताच्या आण्विक प्रकल्पांवर घातलेले निर्बंध काढण्यात आले.**

भारत अमेरिका द्विपक्षीय बैठक हीदेखील दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यासाठी खूप महत्त्वाची ठरली आहेत. भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंध एक वैश्विक राजकीय सामरिकत्ता आहे. जी लोकशाही मूल्ये, द्विपक्षीय, क्षेत्रीय आणि जागतिक हितासाठी आवश्यक आहे.

- ऊर्जा आणि जलवायू परिवर्तन- लीडर क्लायमेंट समिती 2021 मध्ये भारत अमेरीकेने स्वच्छ ऊर्जा अजेंडा 2030 ची सुरुवात केली
- संरक्षण करार- भारत अमेरिकेने मागील काही वर्षात महत्त्वपूर्ण असे रक्षा करार केले आहेत. तसेच क्वाड (भारत अमेरिका जपान ऑस्ट्रेलिया) या देशांची एक औपचारिक संघटना उभी केली याचा मुख्य उद्देश हिंद महासागरात चीनच्या वाढत्या प्रभावाला विरोध करणे हा आहे. पहिल्यांदा हे चार राष्ट्रीय एकत्रितपणे चीनचा प्रतिरोध करत आहेत.
- भारत अमेरिकेच्या मध्ये मूलभूत चार संरक्षण करार आहेत-

1. BECA
2. GSOMIA
3. LEMOA
4. COMCASA

त्याचबरोबर नोव्हेंबर 2019 मध्ये एक त्रि- सेवा अभ्यास- टायगर ट्रायम्फ आयोजित करण्यात आला.

व्यापार- अमेरिका भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. अमेरिकेने 2020/21 साली भारतात प्रत्यक्ष गुंतवणूक करणारा सर्वात मोठा स्रोत म्हणून मॉरिशसला देखील मागे टाकले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात भारताची GSP रद्द केली. विज्ञान औद्योगिक प्रगतीमध्ये देखील खूप महत्त्वपूर्ण सहकार्य असल्याचे दिसते त्यासाठी NISAR या संयुक्त मायक्रोवेव्ह रिमोट सेन्सिंग या उपग्रहाची निर्मिती केली.

भारत अमेरिका महत्त्वपूर्ण करार

1. general security of military information agreement 2002
2. Logistics exchange Memorandum of agreement 2016
3. communications compatibility and security agreement- 2018
4. भारत अमेरिका परमाणु करार- 2008
5. भारत-अमेरिका सामरिक ऊर्जा करार – 2017
6. आतंकवाद विरोधी पक्षीय बैठक -2019

यासारखे अनेक महत्त्वपूर्ण करार दोन्ही राष्ट्रांमध्ये झालेली आपणास दिसून येते.की जेणेकरून दोन्ही राष्ट्रांच्या मध्ये मधुर मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले आहे. आज आंतरराष्ट्रीय क्षेत्रात इतर देश दोन्ही देशांकडे वेगळ्या नजरेने पाहू लागले आहेत आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका आणि भारत या दोन्ही राष्ट्रांचा वेगळाच बोलबाला असल्याचे दिसते. एकंदरीत दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका -भारत असलेले संबंध व शीत युद्धानंतरचे अमेरिका- भारत संबंध आणि आजचे अमेरिका -भारत संबंध यात कमालीची सुधारणा झाल्याचे आपणास दिसते जी निश्चितच राष्ट्रहिताच्या दृष्टीने, व राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने खूप महत्वाची अशी आहे. अमेरिकेने फक्त लष्कर,

व्यापार ,औद्योगिक ,आर्थिक क्षेत्रातच भारताबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले नाही तर भारताच्या स्वास्थ्य आणि परिवार कल्याण विभाग व अमेरिकेच्या हेल्थ आणि ह्युमन सर्विसेस यांच्यात MOU झाला आहे तसेच अमेरिकेच्या W-GDP आणि भारत सरकारच्य "बेटी बचाव बेटी पढाओ "या उपक्रमांतर्गत स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न दोन्ही देशांच्या माध्यमातून चालू असल्याचे दिसते. अशा प्रकारे आधुनिक काळात भारत-अमेरिका संबंध दिवसेंदिवस अधिक दृढ बनत चालले आहे. त्यासाठी द्विपक्षीय बैठक, विविध करार, समित्या, दौरे. यांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. एकूणच पूर्वीपेक्षा आज संबंध सुधारल्याचे दिसते त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात दोन्ही राष्ट्रे व त्यांच्यातील मित्रत्वाचे नाते जगापुढे आदर्श बनत चालल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

प्रस्तुत निबंधातून असा निष्कर्ष निघतो की दुसऱ्या महायुद्धानंतर आणि शीत युद्धाच्या काळानंतर भारत-अमेरिका संबंधाची असलेली चौकट आज बदललेली आहे जेणेकरून दोन्ही देश आज व्यापार ,शिक्षण, आरोग्य, लष्कर या क्षेत्रात एकमेकांना सहकार्य करत आहे व आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली प्रत सुधारण्याचा प्रयत्न करत आहे. आज अमेरिका देखील भारताकडे वेगळ्या नजरेने पहात आहे भारताची आंतरराष्ट्रीय पत सुधारल्याचे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अटल बिहारी वाजपेयी या दोन्ही पंतप्रधानांच्या काळात अनेक भेटी, करार, होऊन भारत-अमेरिका संबंध सुधारण्यासाठी खूप मदत झाल्याचे दिसते . आज भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा हे अमेरिकेच्या सहकार्यामुळे आणि भारताच्या खंबीर नेतृत्वामुळे कोठे ना कोठे सुधरत चालल्याचे दिसत आहे. असे जाणवत आहे.

**संदर्भ**

1. भारताचे परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षितता- डॉ .डी ए मांढरे, पी आर पाटील, बी डी तोडकर.- प्रतिमा पब्लिकेशन अहमदनगर.- जानेवारी 2005
2. आंतरराष्ट्रीय संबंध महत्त्वाच्या संकल्पना- डॉक्टर बी. डी तोडकर- डायमंड पब्लिकेशन- 2012
3. भारताचे परराष्ट्र धोरण- प्रा. बी.बी पाटील - फडके प्रकाशन- 2016
4. महाराष्ट्र टाईम- लेख
5. लोकसत्ता-28 फेब्रुवारी 2020
6. दृष्टी टीव्ही विजन- 29 फेब्रुवारी 2020
7. विकिपेडिया.